**असा. क्र. ४५** **रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**ऑगस्ट १८, २००६/श्रावण २७, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.—**महाराष्ट्र आकस्मिकता निधि अधिनियमात आणखी सुधारणा **पृष्ठे**
करण्यासाठी अध्यादेश. . . . . **३३२-३३४**

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २००६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2006.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND ACT.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**

**महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५६ चा मुंबई ४६. **आणि ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ याच्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४६ यांच्या कलम २ ची तात्पुरती सुधारणा.

**२.** या अध्यादेशाच्या अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम हा, जणू काही त्यातील कलम २ मध्ये, " रुपये एकशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा " या मजकुराऐवजी, " रुपये आठशे कोटी इतक्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात आला आहे, असे समजून अंमलात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम (१९५६ चा मुंबई ४६) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या व ठेवण्यात आलेल्या राज्याच्या आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा रुपये १५० कोटी एवढी आहे.

२. पंतप्रधानांनी जून २००६ मध्ये विदर्भाला भेट दिली असताना तेथील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या विचारात घेऊन तेथील शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारच्या अनुतोषांचे पॅकेज जाहीर केले होते. त्यानुसार, या प्रयोजनासाठी असलेला निधी केंद्र सरकारकडून संवितरित केला जाईल व राज्य शासनाकडून त्याचे वाटप करण्यात येईल. तथापि, या प्रयोजनासाठी कोणतीही अर्थसंकल्पीय तरतूद नसल्याने रुपये ३५० कोटी इतकी तरतूद ताबडतोब करावी लागेल. त्याचप्रमाणे, राज्यात झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या लोकांना नुकसानभरपाई देण्यासाठी रुपये ३०० कोटी एवढा निधी तात्काळ उपलब्ध करून देणे अगत्याचे आहे. उक्त बाबींशिवाय तातडीच्या व अकल्पित स्वरूपाच्या खर्चाच्या अन्य काही बाबींवरही खर्च करावा लागेल. अशा बाबींवरचा खर्च भागविण्यासाठी ८०० कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. खर्चाच्या या बाबी "नवीन सेवा" असतील आणि म्हणून त्या, राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. राज्य विधानमंडळाचे आगामी अधिवेशन दिनांक ४ डिसेंबर २००६ रोजी सुरू करण्याचे ठरले आहे. उपरोल्लिखित बाबींकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले आदेश मात्र राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पुरवणी मागणी व विनियोजन विधेयक संमत करून त्याद्वारे, या "नवीन सेवांवरील" खर्च राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन व ते विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून प्रसिद्ध झाल्यानंतरच देता येतील. तथापि, या बाबींवरील खर्च हा तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तो आकस्मिकता निधीमधून आगाऊ रकमा काढूनच भागवावा लागेल.

३. आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा ही फक्त रुपये १५० कोटींची आहे. उपरोल्लिखित बाबींवरील खर्च भागविण्याकरिता ही शिल्लक अपुरी आहे. म्हणून, पूर्वोक्त खर्च भागविण्याकरिता, सध्याच्या निधीमध्ये रुपये ६५० कोटींची तात्पुरती वाढ करून, आकस्मिकता निधीची मर्यादा रुपये ८०० कोटींची करणे इष्ट वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात सुधारणा करण्याकरिता तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक १७ ऑगस्ट २००६.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. पी. गहरोत्रा,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई